Shriram Education Society, Phaltan

# NAMDEVRAO SURYAWANSHI (BEDKE) COLLEGE, PHALTAN.

## Tal. Phaltan Dist. Satara

## CRITERION NO.7

## Institutional Values And Best Practices

Key Indicater-7.1.2

7.1.2 Institution has facilites and initiatives

7.1.2 The Institution has facilites and initiatives for

1. Alternative sources pf energy and energy conservation measures
2. Management of various types of degradable and non degradable waste
3. Water conservation
4. Green camous initiatives
5. Disabled –friendly ,barrier free environment

श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे

# नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण.

श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटणचे नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय फलटण 2018 ते 2023 या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सामाजिक सांस्कृतिक विचार मंथन घडवून आणण्यासाठी आणि मानवी मूल्यांची जोपासना होण्यासाठी यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संमेलन, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, मेरी मिठी मेरा देश अशा विविध उपक्रमाच्या आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षरोपणाचे कार्यक्रम राबविण्यात आली. कचऱ्याचे व्यवस्थापन करून अनेक ठिकाणांचा परिसर स्वच्छ करण्यात आला, पर्यावरण पूरक सेंद्रिय साधनांचा वापर करण्यासाठी प्रबोधन करण्यात आली. प्लॅस्टिक आणि तत्सम साधने न वापरण्याविषयी जाणीव जागृत करण्यात आली.एज्युकेशन सोसायटी फलटणचे नामदेवराव सूर्यवंशी( बेडके) महाविद्यालय फलटण 2018 ते 2023 या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सामाजिक सांस्कृतिक विचार मंथन घडवून आणण्यासाठी आणि मानवी मूल्यांची जोपासना होण्यासाठी यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संमेलन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मेरी मिठी मेरा देश अशा विविध उपक्रमाच्या आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षरोपणाचे

N.S.(B) COLLEGE PHALTAN

कार्यक्रम राबविण्यात आली कचऱ्याचे व्यवस्थापन करून अनेक ठिकाणांचा परिसर स्वच्छ करण्यात आला पर्यावरण पूरक सेंद्रिय साधनांचा वापर करण्यासाठी प्रबोधन करण्यात आली प्लॅस्टिक आणि तत्सम साधने न वापरण्याविषयी जाणीव जागृत करण्यात आली. एज्युकेशन सोसायटी फलटणचे नामदेवराव सूर्यवंशी( बेडके) महाविद्यालय फलटण 2018 ते 2023 या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सामाजिक सांस्कृतिक विचार मंथन घडवून आणण्यासाठी आणि मानवी मूल्यांची जोपासना होण्यासाठी यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संमेलन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मेरी मिठी  मेरा देश अशा विविध उपक्रमाच्या आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षरोपणाचे कार्यक्रम राबविण्यात आली कचऱ्याचे व्यवस्थापन करून अनेक ठिकाणांचा परिसर स्वच्छ करण्यात आला पर्यावरण पूरक सेंद्रिय साधनांचा वापर करण्यासाठी प्रबोधन करण्यात आली प्लॅस्टिक आणि तत्सम साधने न वापरण्याविषयी जाणीव जागृत करण्यात आली.

Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan,Dist.Satara.

# श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे
# नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय,
# फलटण.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

**अहवाल लेखन** 2022 – 2023

## *10 वे यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संमेलन कार्यक्रम*

दिनांक : 25 नोव्हेंबर 2022

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई पुरस्कृत महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा- फलटण आयोजित, श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण व श्री सद्गुरु प्रतिष्ठान फलटण यांच्या सहकार्याने 10 वे यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संमेलन फलटण 2022दिनांक 25 नोव्हेंबर 2022 रोजी सौ. वेणूताई चव्हाण साहित्य नगरी नामदेवराव सूर्यवंशी बेडके महाविद्यालय फलटण येथे उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

10 वे यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली. यामध्ये यशवंतराव चव्हाण हायस्कूल व ज्यु. कॉलेज फलटण, नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय फलटण, सौ. वेणुताई चव्हाण गर्ल्स हायस्कूल व ज्यु. कॉलेज फलटण, हणमंतराव पवार हायस्कूल फलटण व आचार्य बाळशास्त्री जांभेकर हायस्कूल फलटण या विद्यालयांनी ग्रंथ दिंडी मध्ये सहभाग घेतला. यशवंतराव चव्हाण हायस्कूल व ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी या दिंडीत सहभाग घेत संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश यशवंतरावांनी महाराष्ट्रात आणला हा

देखावा व 1962 साली चीनने भारतावर आक्रमण केले* तेव्हा देशाचे संरक्षण मंत्री पद यशवंतरावजींनी भूषविले व चीनचे आक्रमण परतावून लावले हा 'प्रसंग' या देखाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सादर केला. *फलटण शहरातून या 'चित्ररथांची'* मिरवणूक काढण्यात आली. उद्घाटन सोहळ्याच्या कार्यक्रमाची सुरुवात यशवंतराव चव्हाण ग्रंथ प्रदर्शन शुभारंभाने झाली. या प्रदर्शनाची सुरुवात मा. डॉ. राजू पाटोदकर विभागीय माहिती उपसंचालक पुणे व मा. श्री प्रदीप पाटील सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांनी केले. यानंतर कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन उद्घाटक मा. श्री. उल्हास दादा पवार माजी आमदार व संत साहित्याचे अभ्यासक, पुणे मा. श्री किशोर बेडकीहाळ संमेलनाध्यक्ष यांच्या शुभहस्ते झाले कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष मा. श्री. दिलीपसिंह भोसले यांनी केले व कार्यक्रमाची रूपरेषा, कार्यक्रम आयोजित करण्यामागचा हेतू यशवंत विचार याविषयी आपली भूमिका मांडली. कार्याध्यक्ष डॉ. श्री. सचिन सुभाषराव सूर्यवंशी (बेडके) यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या युगात यशवंत विचार आपण घराघरात पोहोचवणे गरजेचे असून कार्यक्रमाचे स्वरूप, त्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढवण्यात येणार असून त्याचा फायदा लोकांनी करून घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. मा श्री डॉ. राजू पाटोदकर, मा. श्री. विनोद कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतातून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

यावेळी सद्गुरू उद्योग समुहातर्फे सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा यशवंतराव चव्हाण सहकार गौरव पुरस्कार - 2022 हरणाई सहकारी सुतगिरणी, येळीव ता. खटाव चे चेअरमन श्री. रणजितसिंह देशमुख यांना श्री. उल्हासदादा पवार यांच्या हस्ते देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री उल्हास दादा पवार यांनी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या सानिध्यात आपण कसे घडलो याविषयी अनेक प्रसंग सांगितले त्याचबरोबर यशवंतराव चव्हाण साहेबांनी बेरजेचे राजकारण कसे केले व एक उत्तम राजकारणी कसा असावा याविषयी माहिती सांगितली. चव्हाण साहेबांना साहित्यिकांविषयी तळमळ होती, महाराष्ट्रात सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यामध्ये त्यांनी दिलेले योगदान, सौ. वेणुताईंवर त्यांची असलेले प्रेम, भारतीय संस्कृतीतील

आदर्श पती-पत्नी म्हणून या उभय दांपत्याचा आपणास उल्लेख करावा लागेल असे *आपल्या मनोगततून त्यांनी सांगितले.*

संमेलनाध्यक्ष मा श्री किशोर बेडकीहाळ यांनी आजच्या साहित्यिकांविषयी खूप मोलाचे विचार व्यक्त केले साहित्यिक कसा असावा, त्याला समाजाची भान कसे असावे, समाजात जे विकते तेच त्याने लिहू नये, जे खरे आहे,वास्तव आहे त्यावर प्रकाश टाकावा. यशवंतरावांच्या नावाने आपण साहित्य संमेलन भरवत आहात यशवंत विचार आपण घराघरात पोहोचवावा अशा शुभेच्छा यानिमित्ताने त्यांनी दिल्या. कार्यक्रमाचे आभार साहित्यिक ताराचंद्र आवळे यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार मानून या कार्यक्रमासाठी ज्या ज्ञात अज्ञात व्यक्तींनी सहकार्य मदत केली आहे अशा सर्वांचे आभार मानून हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमास म.सा.प. फलटण शाखेचे अध्यक्ष श्री. प्रा. शांताराम आवटे व त्यांचे सर्व सहकारी, फलटण तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. महेंद्र सूर्यवंशी (बेडके), सातारा येथील जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. विनोद कुलकर्णी, श्री. शिरीष चिटणीस, श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटणचे उपाध्यक्ष श्री. बापुसाहेब मोदी, श्री. सी. एल. पवार सर, संचालक श्री. शिवाजीराव सूर्यवंशी (बेडके), फलटण तालुका वारकरी संप्रदाय संघाचे पदाधिकारी व सदस्य तसेच श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण, सद्गुरू हरिबुवा शिक्षण संस्था फलटण, महात्मा एज्युकेशन सोसायटी फलटण, सद्गुरू उद्योग समुहातील अनेक कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच अनेक साहित्यिक व साहित्यप्रेमी नागरिक साहित्य संमेलनाचा आस्वाद घेण्यासाठी उपस्थित होते.

Principal
Namdevrao Suryawanshi(Bedke) College
Phaltan,Dist.Satara.

N.S. COLLEGE PHALTAN






N.S.(B) COLLEGE PHALTAN






N.S.(B) COLLEGE
PHALTAN








N.S.(B) COLLEGE
PHALTAN





N.S.(B) COLLEGE
PHALTAN





N.S.(B) COLLEGE
PHALTAN





N.S. (B) COLLEGE
PHALTAN





N.S.(B) COLLEGE
PHALTAN






N.S.(B) COLLEGE
PHALTAN






N.S.(B) COLLEGE
PHALTAN





श्रीराम एज्युकेशन सोसायटी, फलटणचे

# नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फ

## १० वे यशवंतराव चव्हाण

## मराठी साहित्य संमेलन, फलटण २०

## चित्ररथ : संत साहित्यिक



N.S.(B) COLLEGE PHALTAN

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेव रचिला पाया । उभारिजे देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।
बहिणी फडकती ध्वजा । निरुपण आले ओजा




**कै. नामदेवराव सूर्यवंशी-बेडके महाविद्यालय, फलटण**

श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे

# नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण.

अहवाल लेखन २०२२-२३

दि. १५ ऑगस्ट, २०२२.

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण संचलित यशवंतराव चव्हाण हायस्कूल व ज्युनियर कॉलेज फलटण, सौ वेणूताई चव्हाण गर्ल्स हायस्कूल व ज्युनियर कॉलेज फलटण, नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय फलटण व सौ. वेणूताई चव्हाण डी फार्मसी कॉलेज फलटण या चारही शाखांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे ध्वजारोहन श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव मा. श्री. डॉ. सचिन सुभाषराव सूर्यवंशी (बेडके) यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मा.श्री बापूसाहेब मोदी, उपाध्यक्ष मा. श्री सी एल पवार सर ,संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य मा. श्री शिवाजीराव सूर्यवंशी (बेडके) ,मा श्री प्रकाश तारळकर सर,संस्थेचे प्रशासन अधिकारी मा.श्री पवार पी .पी. तसेच चारही शाखांचे प्राचार्य,उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक- शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी -विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हर घर तिरंगा या अभियाना अंतर्गत प्रशालेमध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्कूल बॅग उपस्थित

मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री डॉ.सचिन सुभाषराव सूर्यवंशी (बेडके) यांनी आपल्या मनोगतातून सर्व शिक्षक -शिक्षिका व विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या व भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता ज्या स्वातंत्र्यवीरांनी बलिदान दिले अशा सर्वांना आपण स्मरण करणे हे आपले कर्तव्य आहे असे सांगितले.


हर घर तिरंगा व स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शालेय परिसरात केलेली रोषणाई तसेच भूगोल शिक्षकांनी तयार केलेला *रांगोळीतून भारताचा नकाशा* यांचे त्यांनी कौतुक केले. तसेच सौ वेणूताई चव्हाण गर्ल्स हायस्कूल मधील विद्यार्थिनींनी ७५ या अंकाची मानवी मनोर-यातून तयार केलेली प्रतिकृती याचेही कौतुक केले. विविध स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.


या कार्यक्रमात राष्ट्रगीत व ध्वजगीत गायन करणाऱ्या विद्यार्थिनी व त्यांचे मार्गदर्शक प्रा. श्री वाघ सर व प्रा. श्री पाटील सर यांचे उपस्थितांनी कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वी रित्या पूर्ण करण्यासाठी यशवंतराव चव्हाण ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य मा श्री थोरात एस बी यांनी नियोजन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ तगारे एस एम व आभार प्राध्यापक श्री यादव एस डी यांनी केले.

N.S.(B) COLLEGE
PHALTAN








N.S.(B) COLLEGE
PHALTAN







N.S.(B) COLLEGE
PHALTAN



N.S.(B) COLLEGE
PHALTAN





श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे

# नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय, फलटण.

अहवाल लेखन २०२२-२३

दिनांक 19/02/2023

नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालयातील एन. एस. एस. युनिटचा निवासी कॅम्प मौजे विडणी येथे संपन्न

रविवार दिनांक 19/02/2023 रोजी नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिटचा 'विशेष श्रमसंस्कार शिबिर' (निवासी कॅम्प 13/02/23 ते 19/02/23) मौजे विडणी येथे संपन्न झाला. ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या समारोप कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे मा श्री सदाशिव मोहिते पत्रकार तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा श्री चंद्रकांत लक्ष्मणराव पवार उपाध्यक्ष, श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण हे लाभले होते. कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रामपंचायत विडणीचे सरपंच मा श्री सागर अभंग उपस्थित होते. तसेच विडणी गावचे ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, विविध क्षेत्रातील मान्यवर, वृत्तपत्रांचे पत्रकार, ग्रामस्थ व एन एस एस कॅम्पचे शिबिरार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व संस्थापक कै. नामदेवराव बळवंतराव सूर्यवंशी (बेडके) नानांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना चे प्रकल्पाधिकारी प्रा. डॉ. सतेज दणाणे यांनी सादर केले. त्यामध्ये त्यांनी शिबिरार्थी यांच्या कार्याचे कौतुक केले व विडणी गावचे सरपंच व ग्रामस्थ यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली.

यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक राऊत यांनी एन. एस. एस. कॅम्पचा आढावा सादर केला.

यानंतर उपस्थित सर्व मान्यवर व पदाधिकारी यांचा पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंचांच्या सूचनेनुसार विडणी ग्रामपंचायतीच्या वतीने उपस्थित मान्यवर, प्राध्यापक वृंद व सर्व शिबिरार्थींचा ही श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

N.S.(B) COLLEGE PHALTAN

यानंतर शिबिरार्थी शिवम घनवट, मयूर साळवे, कु. रिया मुलानी, कु. संजना चव्हाण, कु. धनश्री धोत्रे, रमेश बोडरे, समीर दडस, सूरज पोकळे, उमेश नाळे, कु. प्रेरणा रणवरे, कु. विशाखा मोरे, कु. साक्षी तिवाटणे इत्यादींनी एन एस एस कॅम्प चे अनुभव व गाव आणि ग्रामस्थां प्रति कृतज्ञता व्यक्त केली.

यानंतर विडणी गावचे पोलीस पाटील मा. श्री. धनाजी नेरकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना स्पष्ट केले की, एन एस एस कॅम्प हा विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा क्षण असतो. अशा कॅम्पद्वारे विद्यार्थ्या मध्ये सामाजिक जाणीव रुजवली जाते व ग्राम विकास साधला जातो. यावेळी त्यांनी आपल्या कॉलेज जीवनातील एन एस एस कॅम्प चे अनुभव कथन केले.

यानंतर दैनिक 'धैर्य' चे संपादक मा. श्री. सचिन मोरे यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील यशस्विते संदर्भात विविध यश प्राप्त व्यक्तींचे उदाहरण देऊन कठोर परिश्रम हा कानमंत्र सांगितला. तसेच वक्तृत्व, नेतृत्व व कर्तुत्व याबद्दल मौलिक मार्गदर्शन केले.

यानंतर विडणी ग्रामपंचायत अधिकारी मा. श्री. आप्पासाहेब साळुंखे यांनी आपल्या भाषणामध्ये विडणी गाव व एन एस एस कॅम्प यांच्या समन्वयाबद्दल गौरव उद्गार व्यक्त केले तसेच विडणी गावचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास याबद्दल माहिती दिली.

यानंतर या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती विडणी ग्रामपंचायत सरपंच मा. श्री. सागर अभंग यांनी विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन म्हणजे काय? सामाजिक कार्याची गरज, वक्तृत्व कला, यशस्वी व्यावसाय, सामाजिकता इत्यादी बद्दल मौलिक मार्गदर्शन केले. ग्राम विकासासाठी वाहून घ्या असे सांगितले. एन एस एस ही व्यक्तिमत्व विकासाची शिबिर असून याद्वारे आपण आपल्या कलागुणांना

व सुप्त गुणांचा विकास केला पाहिजे व एक सुजाण नागरिक बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच त्यांनी पुन्हा विडणीमध्ये कॅम्प घेण्यासंदर्भात आमंत्रण दिले. विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले व त्यांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

यानंतर समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दैनिक 'जनमत' व 'पुढारी' चे प्रतिनिधी मा. श्री. सदाशिव रामचंद्र मोहिते सर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना सामाजिक कार्य, देशभक्ती व करियर याबद्दल बहुमोल असे मार्गदर्शन केले.

यानंतर समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मा. श्री. चंद्रकांत लक्ष्मणराव पवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांचे कौतुक केले व विडणी ग्राम पंचायती बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


या कार्यक्रमासाठी वरील मान्यवरांच्या व्यतिरिक्त सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. गणेश नाळे, अन्य ग्रामपंचायत सदस्य, महाविद्यालयाचे प्राध्यापक प्राध्यापिका, विडणी गावचे युवक, ग्रामस्थ व शिबिरार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. साक्षी तिवाटणे, प्रास्ताविक प्रा. डॉ. सतेज दणाणे, कॅम्प आढावा प्र. प्राचार्य डॉ. दीपक राऊत, स्वागत सत्कार प्रा. डॉ. संदेश बिचुकले, आभार प्रकल्प अधिकारी प्रा. डॉ. सतेज दणाणे यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजना च्या घोषणा देऊन व राष्ट्रीय सेवा योजना गीत गाऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

N.S. (B) COLLEGE PHALTAN

S.(B) COLLEGE
PHALTAN



श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण

# नामदेवराव सूर्यवंशी (बेडके) महाविद्यालय

## फलटण

## अहवाल क्र. 3

## ● वृक्षारोपण : स्तुत्य उपक्रम ●

श्रीराम एज्युकेशन सोसायटीचेनामदेवरावसूर्यवंशी(बेडके) महाविद्यालयांमध्ये 15 ऑगस्ट चे औचित्य साधून वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून फलटणचे प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ मा. डॉ.श्री प्रसाद जोशी यांना आमंत्रित करण्यात आले होते.ध्वजारोहणानंतर प्रमुख पाहुणे मान्यवर संस्थेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांच्या समवेत मान्यवरांनी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण केले.

यावेळी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये 50 वृक्ष लावण्यात आले.व त्यांच्या संगोपनाची जबाबदारी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर सोपवण्यात आली यावेळी प्रमुख पाहुण्यांनी पर्यावरणाचे महत्त्व वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन याबाबत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. पर्यावरण हा आपल्या वसंधरेचा कणा आहे हे त्यांनी स्पष्ट केले तसेच अशा प्रकारच्या चांगल्या उद्दिष्टांच्या कार्यक्रम/उपक्रमस त्यांनी शुभेच्छा दिल्या व या स्तुत्य कार्यक्रमांचे कौतुक करून विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे मानद सचिव.मा. डॉ.श्री.सचिन सुभाषराव सूर्यवंशी (बेडके) यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. व स्वातंत्र्य दिनानिमित्त अशा स्तुत्य उपक्रमांचे घेतला त्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्या वेळी महाविद्यालययाचे . प्रा.श्री.गायकवाड .ए.आर यांनी महाविद्यालयातील चांगल्या उद्दिष्ट च्या उपक्रमांचा आढावा सांगितला तरप्राचार्य.डॉ.दीपक राऊत सरयांनी विद्यार्थ्यांना अशा उपक्रमांबद्दल प्रेरणा देण्याचे कार्य केले.

या कार्यक्रमाचे आभार भूगोल विषयाचे प्राध्यापक श्री.पवार.वाय.एस यांनी मानले या उपक्रमात प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री.बापूसाहेब मोदी नियामक मंडळाचे सदस्य श्री.सी.एल.पवार श्री.पटवर्धन सर श्री.शिवाजीराव सूर्यवंशी (बेडके) चारही शाखांचे प्राचार्य उपप्राचार्य पर्यवेक्षक तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे मोजके प्रतिनिधी विद्यार्थी उपस्थित होते या उपक्रमांचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व प्राध्यापक वृंद यांच्या वतीने करण्यात आले होते अशाप्रकारे वृक्षारोपण हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला.



* प्रमुख पाहुणे डॉ.श्री.प्रसाद जोशी वृक्षारोपण करताना. *



*संस्थेचे पदाधिकारी वृक्षारोपण करताना.*

प्र.प्राचार्य
नामदेवराव सूर्यवंशी(बेडके)महाविद्यालय
फलटण जि.सातारा.

श्रीराम एज्युकेशन सोसायटी फलटण

# नामदेवराव सूर्यवंशी(बेडके)महाविद्यालय फलटण

## अहवाल क्र.4

## गणेश विसर्जन व्यवस्थापन


नामदेवराव सूर्यवंशी(बेडके)महाविद्यालयाच्या वतीने व फलटण नगर परिषदेच्या सहकार्याने दरवर्षीप्रमाणेयाहीवर्षी दिनांक 09/09/ 2021 रोजी महाविद्यालयाच्या मैदानावर कृत्रीम ग्रह गणेश विसर्जन तळे तयार केले या तळ्यात फलटण शहरातील घरगुती गणेश विसर्जन केले जाते 11 दिवसाच्या गणेशोत्सवामध्ये दीड दिवसापासून च्या गणपतीचे तसेच अकराव्या दिवसापर्यंत अनंत चतुर्दशीपर्यंत म्हणजे दिनांक 19/ 09/ 2021 पर्यंत हजारो गणेश मूर्तींचे विसर्जन विद्यालयात परिसरातील कृत्रिम तळ्यात विसर्जन केले गेले यावेळी विद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला अनंत चतुर्दशी नंतर दिनांक 20/09/ 2021 रोजी गणेशमूर्तींना पाठवून अलगदपणे बाहेर काढून पुन्हा एकदा त्या मूर्ती वापरण्यासाठी दान केल्या पर्यावरणपूरक उपक्रम महाविद्यालयामध्ये राबवला गेला राष्ट्रीय सेवा योजनेचे अंतर्गत राबविण्यात येणारा हा उपक्रम गेली चौदा वर्ष महाविद्यालयांमध्ये राबविला जातो महाविद्यालया मध्ये राबविला जातो.

महाविद्यालयात शेकून नीरा उजवा कालवा वाहत असल्याने लहान गणेश मूर्तींचे विसर्जन करणे शक्य होत नाही.म्हणून कृत्रिम त्याचा उपयोग फलटण शहरातील गणेशभक्तांना होत असतो फलटण

नगर परिषद दरवर्षी महाविद्यालयास या संदर्भात मदत करत असते.या कृत्रिम तळ्यामध्ये होणारे अनेक अपघात ते टाळता येतात तसे वाहत्या पाण्यात जे धोके असतात ते या कृत्रिम तळ्यात होत नाहीत महाविद्यालयांमध्ये राबविण्यातयेणाऱ्या या उपक्रमाबद्दल सामाजिक स्तरातून कौतुक होत असते.



गणेशविसर्जनासाठी तळे तयार करताना प्राध्यपक,विध्यार्थी व फलटण नगरपरिषद कर्मचारी



प्र.प्राचार्य
नामदेवराव सूर्य... ...के)महाविद्यालय
फलटण, ... ...ारा.

Scanned with OKEN Scanner



N.S.(B) COLLEGE
PHALTAN





N.S.(B) COLLEGE PHALTAN







N.S.(B) COLLEGE PHALTAN







N.S. (B) COLLEGE PHALTAN



PHALTAN





COLLEGE
PHALTAN




NOT ME BUT YOU
राष्ट्रीय सेवा योजना



NOT ME
BUT YOU
राष्ट्रीय सेवा योजना

